मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करा : उद्योगमंत्री उदय सामंत

## पिंपरी-चिंचवड येथे उद्योग विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते : पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेकडून मंत्री महोदयांचा सत्कार

**पिंपरी | प्रतिनिधी**

उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सर्व संबंधित विभागांशी समन्वय साधून उपाययोजना कराव्यात, असे निर्देश उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले. रस्ते, वाहतूक कोंडी, पार्किंगचा प्रश्न सोडविण्यासह आवश्यक तेथे उद्योगांना जागा, पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली.

पिंपरी-चिंचवड येथे उद्योग विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य अभियंता नितीन वानखडे, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे मुख्य अभियंता अशोक भालकर, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्पसंचालक संजय कदम, पुणे विभागाचे उद्योग सहसंचालक शैलेंद्र राजपूत, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रादेशिक अधिकारी अर्चना पाठारे, अधीक्षक अभियंता निलेश मोढवे आदींसह उद्योग संघटना, उद्योगांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



उदय सामंत म्हणाले, पीएमआरडीएच्या माण-म्हाळुंगे टी. पी. स्कीमला लवकरच मुख्यमंत्र्यांची मान्यता मिळणार असल्याने हिंजवडीसाठी पर्यायी रस्त्याच्या कामाला गती मिळणार आहे. राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यानातील रस्त्यातील खड्डे दुभाजक, आदींची देखभाल दुरुस्ती तातडीने करण्याच्या दृष्टीने प्रस्तावाचा पाठपुरावा करावा.

सामंत म्हणाले, तळेगाव येथील फ्लोरीकल्चर पार्कमधील उद्योगांना वाटप केलेल्या भूखंडांबाबत वस्तुस्थिती तपासून घ्यावी. तसेच वाटप केलेले विनावापर भूखंड अन्य उद्योगांना देण्याबाबत विचार करण्यात येईल. तळवडे माहिती तंत्रज्ञान पार्क येथील उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी संरक्षण विभागाशी संपर्क साधा. राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यानातील टप्पा क्र. ३ येथील पोलिस चौकीसाठी आवश्यक त्या जागेचा ताबा पोलिस विभागास देण्यात आला आहे, यावेळी सीसीटीव्ही प्रकल्प, घनकचरा व्यवस्थापन, पावसाळी पाण्याची वाहिनी याविषयी चर्चा झाली.

### पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेकडून सत्कार...

» मंत्री उदय सामंत यांची महाराष्ट्र राज्याच्या उद्योग मंत्रीपदी फेरनिवड झाल्याबद्दल त्यांचा पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेच्या वतीने अध्यक्ष संदीप बेलसरे आणि पदाधिकाऱ्यांनी सत्कार केला. यावेळी पिंपरी, चिंचवड, भोसरी येथील सीईटीपी प्लांट, घातक कचरा प्रक्रिया प्रकल्प, अग्निशमन केंद्र व चाकण येथील उद्योजकांना मुळ शेतकऱ्यांकडून जमीनीवर बांधकाम करण्यास विरोध होत असल्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

# सर्वसामान्यांच्या तक्रारींची दखल घ्या

## शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्या पोलिसांना सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील पोलीस ठाण्यात सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींची तत्काळ दखल घेतली जात नाही. तक्रारदाराला मानसिक त्रास दिला जातो. वाकड, हिंजवडी, काळेवाडी आणि सांगवी या पोलीस ठाण्यासंदर्भातील सर्वाधिक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे तक्रारींकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांना समज देण्याची सूचना मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी पोलीस आयुक्तांना केली आहे. तसेच जनतेचा सरकारवरील विश्वास उडू देऊ नका असेही त्यांनी पोलिसांना सुनावले.

कौटुंबिक, मारहाण, विनाकारण त्रास देत असल्याबद्दल पोलीस ठाण्यात गेल्यास सर्वसामान्य नागरिकांना पोलिसांकडून दाद दिली जात नाही. तत्काळ गुन्हा दाखल करून घेतला जात नाही. तक्रारदाराला धमकावले जाते. त्याच्याशी सौजन्याने संवाद साधला जात नसल्याचा अनेक तक्रारी खासदार श्रीरंग बारणे यांच्याकडे आल्या होत्या. त्यानंतर खासदार बारणे यांनी तत्काळ पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांची भेट घेतली. वाकड, हिंजवडी, काळेवाडी आणि सांगवी पोलीस ठाण्याबाबतचा नागरिकांनी सांगितलेला कठू अनुभव आयुक्तांच्या कानावर घातला.



खासदार बारणे म्हणाले, पोलिसांना केवळ जमीन, खरेदी विक्रीच्या प्रकरणात रस आहे. त्यांना सर्वसामान्य नागरिकांच्या समस्यांशी काही देणेघेणे नाही असे दिसते. शहरातील विविध पोलीस ठाण्यात अनेक गैरप्रकार घडत आहेत. सर्वसामान्य नागरिक तक्रार घेऊन आल्यास त्याची तत्काळ दखल घेतली जात नाही. अनेकवेळा तासनतास पोलीस ठाण्यात बसवून ठेवले जाते. मानसिक त्रास दिला जातो. वाकड, हिंजवडी, काळेवाडी आणि सांगवी पोलीस ठाण्यातील चुकीच्या कारभाराच्या अनेक तक्रारी नागरिकांनी माझ्याकडे केल्या आहेत. हे पोलीस आयुक्तालयाला शोभा देणारे नाही. लोकप्रतिनिधी म्हणून एखाद्या नागरिकाबाबत फोन केल्यास संबंधित व्यक्तीला नाहक त्रास दिला जातो. शहरातील वाढत्या गुन्हेगारीला पोलीस अधिकारीच जबाबदार असल्याचे दिसून येते. तक्रारदाराला नाहक त्रास देणाऱ्या अधिकाऱ्यांना तत्काळ समज द्यावी.

> **पोलिसांनी जमीन खरेदी-विक्री प्रकरणापेक्षा सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींकडे लक्ष द्यावे. नागरिकांना विनाकारण त्रास देऊ नये. अन्यथा आक्रमक भूमिका घेतली जाईल.**
> - श्रीरंग बारणे खासदार

# मद्यधुंद रिक्षाचालकाचा धिंगाणा

## पुणे रेल्वे विभाग व एनडीआरएफचा संयुक्त उपक्रम

**पिंपरी | प्रतिनिधी**

आकुर्डी येथून चिंचवडकडे येणाऱ्या रिक्षाने एसटी बसला पाठीमागून धडक दिली. या अपघातानंतर मद्यधुंद रिक्षाचालकासह त्याच्या साथीदाराने रस्त्यातच गोंधळ घातल्याने ग्रेड सेपरेटरमध्ये सुमारे दीड तास वाहतूक कोंडी झाली. सुदैवाने या अपघातात कोणीही जखमी झाले नाही. पोलिसांनी रिक्षाचालकासह दोघांना ताब्यात घेतले आहे. हा अपघात सोमवारी (ता. २३) दुपारी झाला

भिवंडीहून गाणगापूरला जाणारी एसटी बस (क्रमांक एमएच -२० बी एल ३२२५) सोमवारी दुपारी जुन्या मुंबई-पुणे महामार्गाने आकुर्डीहून चिंचवडच्या दिशेने जात होती. याचवेळी चिंचवड येथील सेंट झेवियर्स चर्च समोरील रस्त्यावर पाठीमागून येणाऱ्या एका रिक्षाने (क्रमांक एमएच -१४ केयु ११२५) बसला पाठीमागून जोरदार धडक दिली. धडक जोरात असल्याने बसचा पत्रा फाटून रिक्षा त्यामध्ये अडकली.



बसमधील प्रवाशांनी व चालकांनी दिलेल्या माहितीनुसार, रिक्षाचालक आणि त्याचा साथीदार दोघेही दारूच्या नशेत होते. त्या स्थितीत त्या दोघांचीच भांडणे सुरू झाली. त्यानंतर त्यांनी बसचालकाला शिवीगाळ करीत हुज्जत घालत तेथे गोंधळ घातला. रिक्षाचालक व त्याचा साथीदार हातात दगड घेऊन परिसरात फिरत होते. त्यानंतर त्यांनी बसच्या वायरी तोडल्याने बस चालकाला बस सुरू करता आली नाही.

> **पोलिस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी रिक्षा चालकासह त्याच्या साथीदाराला ताब्यात घेतले. बसमध्ये अडकलेली रिक्षा बाजूला घेऊन वाहतूक सुरळीत केली. रिक्षाचालक व त्याचा साथीदार दोघांनाही ताब्यात घेतले असून दोघांपैकी एकाने मद्यपान केलेले होते. त्यांना वैद्यकीय तपासणीसाठी पाठवले आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे.**
> - सी. डी. साळुंखे, पोलिस उपनिरीक्षक, पिंपरी पोलिस ठाणे

# पुणे पालिका दोन भागात विभागणार : चंद्रकांत पाटलांच वक्तव्य

## शहराच्या वाढत्या भौगोलिक क्षेत्राचा विचार करता शहरासाठी दोन महापालिका कराव्या लागतील. दोन स्वतंत्र महापालिका करण्यासाठी उशीर चालणार नाही,

**पुणे | प्रतिनिधी**

राज्याच नविन सत्ता येताच राज्यात अनेक बदल करण्यात येत आहेत. अशातच, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील पुणे पालिकासंदर्भात मोठं वक्तव्य केलं आहे. पुणे महापालिकेचे विभाजन करावे लागेल असं पाटलांनी वक्तव्य केल्यामुळं पुण्यातील राजकारणाला आता नवं वळण मिळणार आहे. पाटलांच्या या वक्तव्याला आता कोणा कोणाचा पाठिंबा असणार याकडे सर्वांचे लक्ष वेधलं आहे.

पुणे श्रमिक पत्रकार संघातर्फे शहरातील नवनिर्वाचित आमदार व मंत्र्यांसोबत वार्तालापाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी चंद्रकांत पाटील यांनी पुण्याच्या पालिकासंदर्भात आपलं मत व्यक्त केलं.

महापालिकेचे विभाजन होणे गरजेचे आहे. मात्र, त्यात राजकीय सामाजिक, भौगोलिक असे अनेक विषय गुंतलेले आहेत. त्यामुळे यावर व्यापक चर्चा अपेक्षित आहे. नावांचा प्रश्न अशा वेळी अतिशय महत्त्वाचा ठरतो. त्यातही पुणे नावाला इतिहास आहे. त्यामुळे पुणे नावाचा समावेश असलाच पाहिजे, याबाबत सगळेच आग्रही असणार. अशा अनेक गोष्टींचा साधकबाधक चर्चा झाल्यानंतरच महापालिकेच्या विभाजनाचा निर्णय होईल असं पाटील यावेळी म्हणाले.

तसेच यासोबत पुण्याचा दादा कोण? असा प्रश्न विचारला असता, त्यांनी हा जटिल प्रश्न आहे, असे उत्तर दिले. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे डोके सुपीक आहे. २३७ इतक्या मोठ्या संख्येने प्रथमच आमदार आहेत, त्यांनी बरोबर मंत्रिमंडळ तयार केले. आता हाही प्रश्न ते समाधानकारक पद्धतीने निकाली काढतील, असे पाटील म्हणाले.



### पुण्याच्या दोन महापालिका होण गरजेचं- श्रीकांत गबाले

» भौगोलिक अभ्यासक श्रीकांत गबाले यांनी पुण्याच्या दोन महापालिका होण गरजेचं आहे, असं मत व्यक्त केलं आहे. 10 लाख लोकसंख्यांची 1 महापालिका असते, मात्र पुण्याची सध्याची लोकसंख्या 45 लाखांच्या घरात आहे. त्यामुळे 4 महापालिका हव्यात पण दोन तरी झाल्या पाहिजे. महापालिका दोन झाल्यामुळे पाण्याचा प्रश्न काही प्रमाणत सुटेल. पायाभूत सुविधा उपलब्ध होतील, डंपिंग ग्राउंडचा प्रश्न मार्गी लागेल. वाढलेल्या लोकसंख्या आणि पुण्याचं नीट नियोजन होईल. 2020 ला काही गाव महापालिकेत समाविष्ठ झाल्यावर देखील वेगळ्या महापालिकेची मागणी झाली होती.मात्र, चार वर्षात याबाबत कोणतंही काम झालं नाही. आता हे काम होणं गरजेचं आहे. पुण्यात जायकासारखे प्रोजेक्ट सुरु आहेत, असे अनेक प्रोजेक्ट आल्यावर यंत्रणा नीट काम करण्याची गरज आहे, त्यामुळे पुण्याच्या दोन महापालिका होण गरजेचं असल्याचं मत श्रीकांत गबाले यांनी व्यक्त केलं आहे..

### याबाबत पुणेकर काय म्हणतात?

» गेल्या काही दिवसांपूर्वी पुण्यात काही गावांचा समावेश झाला आहे, त्यामुळे पुण्यात प्रचंड वाहतुकीचा प्रश्न आहे. वाढती लोकसंख्या आहे. खड्डयांचे प्रश्न आहेत. पाणीपुरवठ्याचा प्रश्न आहे. त्यानंतर चांदणी चौकात होणार वाहतूक कोंडी आहे. सर्वत्र समस्या आहेत. त्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेवरती सर्व भार आहे आणि पालिकेवर इतका भारी टाकून चालणार नाही. त्यामुळे अग्रेसर जर व्हायचं असेल तर पिंपरी चिंचवड महानगरपालिका आहेत, तशीच पुणे महानगरपालिका देखील आहे. तर अतिरिक्त एक महानगरपालिका झाली तर लोकांची सोयी सुविधा आणि प्रश्न मार्गी लागतील अशी भूमिका एका पुणेकरांनी व्यक्त केली आहे.

# मराठी भाषा विभाग प्रत्येकाच्या घरापर्यंत पोहोचण्याच्या दृष्टिकोनातून काम करावे

## असे निर्देश मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केले

**पुणे | प्रतिनिधी**

मराठी भाषा विभागाने मराठी भाषेचा गौरव वाढेल अशा पद्धतीने काम करतानाच हा विभाग प्रत्येकाच्या घरापर्यंत पोहोचेल अशा पद्धतीने काम करावे, असे निर्देश मराठी भाषा मंत्री उदय सामंत व्यक्त केली.

पिंपरी चिंचवड येथे मराठी भाषा विभाग आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी विभागाचे सहसचिव नामदेव भोसले, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर, मराठी भाषा विभागाचे अवर सचिव नितीन डंगारे, राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक तथा विश्वकोश निर्मिती मंडळाचे प्रभारी सचिव डॉ. शामकांत देवडे, भाषा संचालक विजया डोणीकर, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या सचिव मीनाक्षी पाटील, विभागाच्या कक्ष अधिकारी ऐश्वर्या गोवेकर आदी उपस्थित होते.



मंत्री उदय सामंत म्हणाले, राज्यभाषेला अभिजात भाषेचा दर्जा असलेल्या तामिळनाडू किंवा अन्य राज्यांप्रमाणे महाराष्ट्रानेही आपल्या भाषेच्या विकासासाठी केंद्र शासनाकडून अधिकाधिक निधी मिळावा यासाठी प्रस्ताव पाठवून गतीने पाठपुरावा करावा.

ते पुढे म्हणाले, दुसरे विश्व मराठी संमेलन 27, 28 फेब्रुवारी आणि 1 मार्च असे तीन दिवस पुणे येथे घेण्यात येईल. त्यासाठी विभागाने तयारी करावी. तसेच दिल्ली येथे होणाऱ्या विश्व साहित्य संमेल्लनात मराठी भाषेसाठी एक तास राखून त्या माध्यमातून जागतिक स्तरावर मराठी भाषा जाईल यासाठी प्रयत्न करावेत.

राज्यस्तरावर महिला साहित्य संमेलन तसेच विभागनिहाय युवा साहित्य संमेलनाचे आयोजन करण्याचे नियोजन करावे, असे निर्देशही मराठी भाषा मंत्री श्री. सामंत यांनी दिले. देशातील सर्व बृहन्महाराष्ट्र मराठी मंडळांना आमंत्रित करुन मराठी भाषेसाठी काय योगदान देता येईल यासाठी त्यांच्या सूचना जाणून घ्याव्यात. सर्व महाविद्यालयात मराठी भाषा विभागाची प्रकाशने ठेवण्यासाठी प्रयत्न करावेत.

सर्व विद्यापीठातील मराठी भाषा विभागात मराठी भाषा संशोधन केंद्र स्थापन करण्यासाठी प्रस्ताव करावेत. पुस्तकांचे गाव या संकल्पनेच्या अनुषंगाने त्या त्या जिल्ह्यातील नामांकित लेखकांची नावांची यादी करावी, त्याचप्रमाणे कवितांचे गाव या संकल्पनेवरही काम करावे. शासनाच्या सर्व विभागांच्या प्रदर्शनात मराठी भाषा विभागाचे दालन असले पाहिजे, असेही निर्देश त्यांनी यावेळी दिले.

मराठी भाषेला अभिजात मिळाल्याचे महत्त्व तसेच त्यामुळे होणारे लाभांची माहिती युवकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करावेत. मराठी भाषा विभागांतर्गत असलेल्या सर्व संस्था, मंडळ, संचालनालयांना चांगली जागा मिळण्यासाठी प्रस्ताव करावेत, त्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

# वाचन संकल्प महाराष्ट्राचा

## उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा राज्यभर उपक्रम

**पुणे | प्रतिनिधी**

तरुण पिढी वाचनापासून दुरावत चालली आहे. या पिढीला प्रत्यक्ष ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करण्याच्या उद्देशाने राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने महाविद्यालयांमध्ये "वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या उपक्रमामुळे लाखो विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अवांतर पुस्तक वाचनाकडे वळतील, असे उच्च शिक्षण विभागाचे म्हणणे आहे.



नव्या वर्षात राज्यातील ४५ लाख विद्यार्थी पुस्तके वाचून त्यांचे परिक्षण लिहिणार आहेत. १ ते १५ जानेवारी या कालावधीत हा वाचन पंधरवडा उपक्रम राबवण्यात येणार आहे. राज्यातील प्रत्येक महाविद्यालयांना त्यांच्या स्तरावर पुस्तक परिक्षण आणि कथन स्पर्धा राबवावी लागणार आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याने वाचलेल्या आवडीच्या पुस्तकातील परिक्षण लिहून द्यावे लागणार आहेत. हे परिक्षण ५०० शब्दांचे असावे किंवा त्याचे ५ मिनिटे कथन करावे. यातील ३ उत्कृष्ट परिक्षणांची निवड करून त्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व बक्षीस दिले जाणार आहे, असेही उच्च शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

तरुणांना वाचनाकडे वळविण्यासाठी राज्य सरकारने हा उपक्रम हाती घेतला आहे. त्याद्दष्टीने कॉलेज, विद्यापीठे, सार्वजनिक ग्रंथालये या माध्यमातून वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. नवीन वर्षाच्या सुरुवातीला राज्यातील सर्व कॉलेजेस, विद्यापीठे आणि सार्वजनिक ग्रंथालये यांना त्यांच्या संस्थेच्या प्रांगणात वाचनाचा सामूहिक उपक्रम राबविण्याच्या सूचना उच्च शिक्षण विभागाने दिल्या आहेत.

या उपक्रमाची छायाचित्रे कॉलेजांना त्यांच्या संकेस्थळावर, स्थानिक वर्तमानपत्रात आणि समाजमाध्यमांवर प्रसिद्धीस देण्यासही सांगण्यात आले आहे. तसेच विद्यार्थ्यांनी कोणती पुस्तके वाचावीत आणि ती कशी वाचावीत याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी कार्यशाळा घ्यावी, असेही निर्देश देण्यात आले आहेत.

# औद्योगिक परिसरावर 'तिसऱ्या डोळ्या'ची नजर

## कंपनी, शॉपलगतचे रस्ते कव्हर होतील या पद्धतीने बसवणार सीसीटीव्ही कॅमेरे

**पिंपरी | प्रतिनिधी**

औद्योगिक परिसरातील चोऱ्या तसेच इतर घातपाती कारवाया रोखण्यासाठी आता कंपनी, शॉपलगतच्या परिसरातील रस्तेही कव्हर होतील, या पद्धतीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जाणार आहेत. पोलिसांनी केलेल्या सूचनांनुसार, पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटनेने पिंपरी-चिंचवड औद्योगिक परिसरातील सर्व कंपन्या, शॉप व इतर औद्योगिक आस्थापनांना याबाबत पत्रकाद्वारे स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.



> भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात लघुउद्योग संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत नुकतीच बैठक घेण्यात आली होती. या बैठकीत पोलीस अधिकाऱ्यांनी औद्योगिक परिसरातील चोऱ्या तसेच इतर घातपाती कारवाया रोखण्यासाठी कंपनी, शॉपसमोरील परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. तसेच, आपल्या आस्थापनेसमोरील रस्तेही कव्हर होतील, अशा प्रकारे चांगल्या प्रतीचे कॅमेरे बसवावेत, अशा सूचना केल्या होत्या. त्या अनुषंगाने शहरातील सर्व कंपन्या व लघुउद्योजकांना सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याबाबत सूचना करण्यात आल्या आहेत.
>
> - संदीप बेलसरे, अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटना.

भोसरी एमआयडीसीतील एस. जे. डब्ल्यू आणि टी ब्लॉक, पिंपरीतील एफ २, एच ब्लॉक, चिंचवड मधील डी १, डी २ आणि डी ३ हे सर्व ब्लॉक तसेच, भोसरी औद्योगिक परिसरातील सेक्टर ७ आणि १०, शांतीनगर, चिखली, कुदळवाडी, तळवडे, ज्योतिबानगर, शेलारवस्ती-चिखली, चोविसावाडी-चऱ्होली, बारणेवस्ती-मोशी अशा प्रचंड मोठ्या प्रमाणात पिंपरी-चिंचवड शहरातील औद्योगिक पट्टा विस्तारलेला आहे. या औद्योगिक परिसरातील बहुतांशी कंपन्यांमध्ये सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. परंतु, हे कॅमेरे कंपन्यांच्या आतील बाजूस असतात. कंपनीलगतचे मुख्य, अंतर्गत रस्तेही त्या कॅमेऱ्यांमध्ये येणे गरजेचे असते. अनेकदा अपघात, घातपाताचे प्रकार घडतात. याशिवाय कंपनीतून घरी सुटल्यानंतर कामगारांकडील मोबाईल फोन, पगाराची रोकड लुटून नेण्याचे प्रकारही सातत्याने घडतात.

मात्र, घटनास्थळावरील कंपन्यांमध्ये रस्त्याच्या बाजूला सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याचे अनेकदा निदर्शनास येते. त्यामुळे आरोपींचा माग काढणे पोलिसांनाही कठीण होते. ही बाब लक्षात घेऊन भोसरी एमआयडीसी पोलिसांनी लघुउद्योग संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत नुकतीच बैठक घेतली. औद्योगिक परिसरातील गुन्हे रोखण्यासाठी कंपनी, शॉपसमोरील परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. तसेच, आपल्या आस्थापनेसमोरील रस्तेही कव्हर होतील, अशा प्रकारे चांगल्या प्रतीचे कॅमेरे बसवावेत, अशा सूचना करण्यात आल्या.

त्या अनुषंगाने लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे यांनी पत्रक प्रसिद्धीस दिले आहे. औद्योगिक परिसरामध्ये चोऱ्या, गुन्हे तसेच दहशतवादी कारवाया, समाज कंटकाकडून घातपाती कृत्ये घडू नये याकरिता सुरक्षिततेच्या व कायदा - सुव्यवस्थेच्या अनुषंगाने औद्योगिक आस्थापना, कंपनी, शॉपसमोरील परिसर व रस्ते कव्हर होतील, अशाप्रकारे चांगल्या प्रतीचे सीसीटीव्ही कॅमेरे किमान ३० दिवसांपर्यंत स्टोअरेज क्षमतेसह बसवण्यात यावे, कॅमेरे बसवण्यापूर्वीचे व बसवल्यानंतरचे फोटो काढून जुन्या व नवीन बसवण्यात आलेल्या कॅमेऱ्यांच्या माहितीसह भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यातील संतोष फावडे (९९२३१२४१०५) व लघुउद्योग संघटनेचे औटी (९८८१४५०२२५) यांना कळवण्यात यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कल्याण-डोंबिवली महापालिका आयुक्तांची महापालिकेला भेट

## महापालिकेचे विविध महत्वाकांक्षी उपक्रमांमुळे शहराच्या शाश्वत विकासामध्ये लक्षणीय प्रगती

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेचे नाविन्यपूर्ण प्रकल्प, पायाभूत सुविधा आणि विविध महत्वाकांक्षी उपक्रमांमुळे शहराच्या शाश्वत विकासामध्ये लक्षणीय प्रगती झाली असून त्यामुळे नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास देखील मदत झाली आहे. अशाच सर्वसमावेशक लोककल्याणकारी धोरणांचा अवलंब करून अंमलबजावणी करण्याचा आमचा प्रयत्न राहील, असे कल्याण डोंबिवली महापालिकेच्या आयुक्त इंदूराणी जाखड म्हणाल्या.

पिंपरी चिंचवड महापालिकेचे विविध प्रकल्प, उपक्रम आदी ठिकाणी कल्याण डोंबिवली महापालिकेच्या आयुक्त इंदूराणी जाखड (आयएएस) यांच्यासह त्यांच्या शिष्टमंडळाने पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीस भेट देऊन विविध प्रकल्पांची माहिती घेतली, त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी कल्याण डोंबिवली महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे, हर्षल गायकवाड, शहर अभियंता अनिता परदेशी, उप आयुक्त अतुल पाटील, रमेश मिसाळ, स्वाती देशपांडे, अवधूत तावडे, कार्यकारी अभियंता संदिप तांबे, योगेश गोटेकर, प्रमोद मोरे, उपअभियंता प्रसाद सुखदेव, सहाय्यक अभियंता राहुल म्हात्रे, पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, शहर अभियंता मकरंद निकम, उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, सहाय्यक आयुक्त श्रीकांत कोळप, विजयकुमार थोरात, प्रशासन अधिकारी संगिता बांगर यांच्यासह महापालिकेचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



आयुक्त जाखड म्हणाल्या, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरात उभारण्यात आलेल्या प्रकल्पांची आणि उपक्रमांची माहिती करून घेऊन अनुभव घेणे प्रेरणादायी ठरले. कचऱ्यापासून वीजनिर्मिती, कचऱ्यापासून बायोगॅस यांसारखे महत्वाकांक्षी प्रकल्प हे शहरी शाश्वततेला आत्मसात करून आव्हानांना संधीमध्ये कसे बदलू शकतात याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. यासोबतच दिव्यांग भवन सारखे प्रकल्प सर्व समाजघटकांना सन्मानपूर्वक वागणूक देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केलेल्या प्रयत्नाचे आणि वचनबद्धतेचे प्रतीक आहे. यासोबत शिक्षण विभागाने शिक्षणाच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा करण्यासाठी केलेल्या उपक्रमांपासून ते पर्यावरण विभागाच्या वतीने राबविण्यात आलेले हरित उपक्रम आणि अग्निशमन विभागाच्या सुरक्षा उपाययोजनांमधील प्रगत तंत्रांपर्यंत महापालिकेचा विकासाच्या दृष्टीने व्यापक आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन स्पष्ट दिसून येतो. त्याचप्रमाणे कर संकलन प्रणालीतील कार्यक्षमता तसेच वैद्यकीय आणि आरोग्य विभागाच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे नागरी केंद्रित प्रशासनासाठी महापालिकेची बांधिलकी देखील अधोरेखित होते. या प्रकल्पांमधून मिळालेल्या अंतर्दृष्टीचा कल्याण डोंबिवली शहराच्या विकास आराखड्यात समावेश करण्यासाठी उत्सुक असल्याचेही त्या म्हणाल्या.

यावेळी शिष्टमंडळास महापलिकेच्या विविध विभागामार्फत शहरात उभारण्यात आलेले प्रकल्प, योजना, उपक्रमांची संगणकीय सादरीकरणाद्वारे माहिती देण्यात आली. त्यामध्ये करसंकलन प्रणाली, स्मार्ट सारथी, अग्नी सुरक्षा सर्वेक्षण, अर्बन स्ट्रीट स्केप तसेच शिक्षण विभागाच्या वतीने राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा समावेश होता. याव्यतिरिक्त, शिष्टमंडळाने मुंबई-पुणे-नाशिक रोडवरील अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार विकसित करण्यात येणारे रस्ते, मोरवाडी येथील दिव्यांग भवन, मोशी येथील कचरा डेपो आणि कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्प, वेस्ट टू बायोगॅस प्रकल्प, पिंपळेगुरव येथील ८ टू ८० उद्यान, पिंपळे सौदागर येथील लिनीअर गार्डन, शहरातील विविध उड्डाणपुलांखालील हॉकर्स झोन आदी प्रकल्पांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांची सविस्तर माहिती घेतली.

आयुक्त शेखर सिंह म्हणाले, शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आरोग्य, वैद्यकीय, शैक्षणिक, आर्थिक, पर्यावरण आणि नागरी सुरक्षा अशा सर्वच क्षेत्रांमध्ये अत्याधुनिक प्रणालीचा वापर करून नागरिकांना केंद्रस्थानी ठेऊन अधिक जलद गतीने सेवा देण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम आणि प्रकल्प राबविण्यात येत आहेत.

# शहरातील पुलांचे होणार 'स्ट्रक्चरल ऑडीट'

## संबंधित पुलांची सद्यःस्थिती नेमकी कशी : महापालिकेकडुन केली जाणार पाहणी

**पुणे | प्रतिनिधी**

शहराच्या विविध भागातील ओढे-नाले, कालव्यांवर महापालिकेने पुल बांधलेले आहेत. मात्र पुलांची संख्या किती आहे, याची कोणतीही माहिती अद्याप महापालिकेकडे नाही. त्यामुळे आता यापुलांची माहिती घेतली जाणार असून 'स्ट्रक्चरल ऑडीट' केले जाणार आहे.

शहरात आंबील ओढा, भैरोबा नाल्यासह अनेक मोठे नाले-ओढे आहेत. यावर पुल बांधण्यात आले आहेत. मात्र त्याकडे प्रशासनाचे सध्या तरी कोणतेही लक्ष नाही. ओढ्यांवर स्लॅब टाकून पूल तयार करण्यात आलेले आहेत. हे पुल आता जुने आणि धोकादायक झाले आहेत. शहरात वाहतूक कोंडीची समस्येने नागरिक त्रासले आहेत. त्यामुळे गल्लीबोलातील रस्त्यावरही वाहनांची वर्दळ वाढली आहे. या छोट्या पुलांवरुन वाहतूक होत असल्याने कोणतीही मोठी दुर्घटना घडू नये, यासाठी पुलांची पाहणी केली जाणार असून स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचा निर्णय महापालिकेकडून घेतला जाणार आहे.



याबरोबरच मुठा डावा कालवा देखील शहरातुन ग्रामीण भागामध्ये जातो. संबंधित नाले, ओढे, कालव्यावर महापालिका प्रशासनाकडुन अनेक वर्षापुर्वी छोटे-मोठे पुल बांधण्यात आले. या पुलांवरुन मोठ्या प्रमाणात वाहतुक होते. त्यापैकी काही पुल जुने झाले असल्याने ते धोकादायक झाले आहेत का ? संबंधित पुलांची सद्यःस्थिती नेमकी कशी आहे ? याबाबतची पाहणी महापालिकेकडुन केली जाणार आहे. या पुलांचे महापालिकेच्या विशेष प्रकल्प विभागाकडुन स्ट्रक्चरल ऑडीट केले जाणार आहे, त्यातुन पुलांच्या सद्यःस्थितीची माहिती महापालिकेस मिळणार आहे. त्यानंतर पुलांच्या कामांसंदर्भात पुढील प्रक्रिया केली जाणार आहे.

याबाबत महापालिकेच्या विशेष प्रकल्प विभागाचे मुख्य अभियंता युवराज देशमुख म्हणाले,"ओढे-नाले व कालव्यांवरील पुल सध्या सुरु आहेत. मात्र, या पुलांचे नेमकी काय स्थिती आहे, हे जाणुन घेणे गरजेचे आहे. त्यातुन पुलाची डागडुजी करण्यास प्राधान्य देण्यात येणार आहे. त्यामुळे भविष्यात होणारे धोके टाळणे शक्य होईल. त्यादृष्टीने या पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचे काम केले जाणार आहे.'

### नदीवरील 38 पैकी 11 पुलांचे काम पुर्ण..

» महापालिकेने दोन वर्षापुर्वी नदीवरील ३८ पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट केले होते. पुलांची कामे करण्यासाठी महापालिकेने ३५ कोटी रुपयांची तरतुद केली होती. परंतु महापालिकेने १५ कोटी रुपयेच मंजूर केले होते. त्यामुळे प्राधान्याने विशेष प्रकल्प विभागाने ११ पुलांची कामे केली. तर आता उर्वरीत २७ पुलांच्या कामासाठी अंदाजपत्रकात तरतुद केली जाणार आहे. त्यानुसार, दुसऱ्या टप्प्यात ही कामे केली जाणार आहे. त्यासाठीच्या निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

# पुणे-मिरज रेल्वे दुहेरीकरण नववर्षात

## आतापर्यंत किती कोटी खर्च झाले : क्षमता मोठी, मात्र गाड्यांची वानवा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-मिरज दरम्यान २८० किलोमीटर लोहमार्गाच्या दुहेरीकरणाचे काम नऊ वर्षांत अद्यापही अखेरच्या टप्प्यात आहे. या प्रकल्पासाठी सुमारे चार हजार कोटी रुपये खर्च झाला आहे. मात्र २०२४ संपत आले तरीही दुहेरीकरणाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. नवीन वर्षात मार्चपर्यंत हे काम पूर्ण होण्याची शक्यता असल्याचे सांगण्यात आले.

पुणे-मिरज दुहेरी मार्गावरून सध्या दिवसाला फक्त सहा एक्स्प्रेस व तीन पॅसेंजर धावत असल्याने प्रवासी गाड्यांची संख्या वाढविण्याची मागणी आहे. मध्य रेल्वेने पुणे-मिरज या २७९ किलोमीटर रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरण व विद्युतीकरणाचे काम सन २०१६ मध्ये सुरू केले. हे काम मे २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट होते. या प्रकल्पासाठी चार हजार ८८२ कोटी रुपये खर्च मंजूर केला आहे.



पुण्याजवळ फुरसुंगीजवळ पूल बांधणीचे काम अद्याप अपूर्ण असल्याने या तेथील दुहेरीकरणाच्या कामाला वेळ लागत आहे. सध्या या मार्गावरून दिवसाला फक्त सात एक्स्प्रेस व तीन पॅसेंजर धावत असल्याने हजारो कोटी खर्च करून तयार केलेल्या या दुहेरी मार्गावरील प्रवासी गाड्यांची संख्या वाढविण्याची मागणी आहे.

पुणे ते मिरजदरम्यान वेगवेगळ्या टप्प्यांत दुहेरीकरण पूर्ण झालेल्या नवीन मार्गावर वेगाच्या चाचणीत जास्तीत जास्त १३० किलोमीटर प्रतितास वेग गाठला. ही चाचणी यशस्वी झाल्याने सुरक्षा आयुक्तांनी या मार्गावरून ताशी ९० किलोमीटर वेगाने गाड्या चालविण्यास मान्यता दिली आहे. तयार झालेल्या सुमारे २४० किलोमीटर दुहेरी मार्गावरून माल व प्रवासी वाहतूक सुरू आहे.

मध्य रेल्वेने पुणे-मिरज मार्गाच्या दुहेरीकरणासाठी ४ हजार ८०० कोटी रुपये खर्चास मंजुरी दिली आहे. त्यापैकी ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. पुणे ते मिरजदरम्यान दुहेरीकरण व विद्युतीकरण पूर्ण होत आले आहे. मात्र, या मार्गावर गाड्यांची संख्याच खूपच कमी आहे. सध्या या मार्गावर कोयना, महालक्ष्मी, महाराष्ट्र, चालुक्य, गोवा एक्स्प्रेस, कोल्हापूर पुणे विशेष एक्स्प्रेस व पाच पॅसेंजर गाड्या दररोज धावतात. पुणे- हुबळी- पुणे कोल्हापूर वंदे भारत एक्स्प्रेसचाही वेग वाढणार आहे.

### धावणाऱ्या गाड्या

» पुणे-मिरज मार्गावरून दररोज धावणाऱ्या एक्स्प्रेस व पॅसेंजर - ९
» पुणे-मिरज मार्गावरून आठवड्यातून एकदा धावणाऱ्या एक्स्प्रेस - ११
» पुणे-मिरज मार्गावर आठवड्यातून दोन व तीन वेळा धावणाऱ्या एक्स्प्रेस - २६
» पुणे-मिरज मार्गावरून एकूण धावणाऱ्या एक्स्प्रेस व पॅसेंजर - २७.